MHRG090005802024

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०७/१०/२०२४ |
| नोंदणी दिनांक | : | ०७/१०/२०२४ |
| निकाल दिनांक | : | १०/०७/२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस |
| | | ०१ ०९ ०३ |

**फॉर्म नं.XXXII**

**भाग 'अ'**

**(न्यायनिर्णयाचे शिर्ष पान)**

**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४(i)]**

<table>
<tr><td colspan="2" align="center"><u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा, जिल्हा–रायगड यांचे न्यायालयात</u><br>(पिठासीन अधिकारी : सं. वि. खैरे)<br>न्यायनिर्णय घोषीत दि.१०/०७/२०२६<br>नि. फौ. खटला क्र.५०/२०२४<br>निशाणी क्र. ३७</td></tr>
<tr><td colspan="2" align="center">गुन्हा नोंद क्र.१४९/२०२४, रोहा पोलीस ठाणे</td></tr>
<tr><td>अभियोग पक्ष</td><td>महाराष्ट्र शासन,<br>रोहा पोलीस ठाणे.<br>ता. रोहा, जि. रायगड.</td></tr>
<tr><td>अभियोगपक्षातर्फे विधीज्ञ</td><td>श्री. ए. एल. पवार,<br>विशेष सहा. सरकारी अभियोक्ता.</td></tr>
<tr><td>आरोपी</td><td>१. लिंबाजी रामचंद्र केंडे<br>वय – ४७ वर्षे,<br>२. राजु लिंबाजी केंडे<br>वय – २० वर्षे,<br>३. जनाबाई लिंबाजी केंडे<br>वय – ४४ वर्षे,<br>सर्व रा. मु. इंदरदेव, पो. धामणसई,<br>ता. रोहा, जि. रायगड.</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | श्री. एम. डी. पाटील |

**भाग ब**
**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४(ii)अन्वये]**

| | |
|---|---|
| **गुन्हा घडल्याचा दिनांक** | २४/०७/२०२४ |
| **फिर्याद दाखल दिनांक** | २४/०७/२०२४ |
| **दोषारोप पत्र दाखल दिनांक** | ०७/१०/२०२४. |
| **दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक** | १६/०१/२०२५. |
| **पुरावा सुरु झाल्याचा दिनांक** | २१/०२/२०२५. |
| **न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक** | १०/०७/२०२६. |
| **न्यायनिर्णय घोषित दिनांक** | १०/०७/२०२६. |
| **शिक्षा दिली असल्यास ती दिनांक** | निरंक. |

**आरोपीचा तपशील**

| आरोपी क्र. | आरोपींचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं कलम ४२८ नुसार संपरीक्षे दरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१.<br>०२.<br>०३. | लिंबाजी रामचंद्र केंडे<br>राजु लिंबाजी केंडे<br>जनाबाई लिंबाजी केंडे | अटक नाही<br>अटक नाही<br>अटक नाही | –<br>–<br>– | भा.न्या.सं. कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२) सह कलम ३(५) प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## :: न्यायनिर्णय ::

(दिनांक १० जुलै, २०२६ रोजी घोषीत)

आरोपी क्र.१ ते ३ यांचेविरूध्द भारतीय न्याय संहिता २०२३ (यापुढे सोयीकरीता संक्षिप्तरित्या भा.न्या.सं. असे संबोधण्यात आले आहे.) कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२) सह कलम ३(५) या गुन्ह्यासंबंधी संपरीक्षा चालविण्यात आली आहे.

**अभियोग पक्षाची हकीकत संक्षिप्त स्वरुपात खालीलप्रमाणे आहे.**

०२. फिर्यादी बिराजी हा दि.२४.०७.२०२४ रोजी सकाळी ७.३० वाजेच्या सुमारास शेणगोठा काढत होता, त्यावेळी त्याची पत्नी गंगुबाई, मुलगा यशवंत दोघे म्हशी चारायला घेवुन गेले होते. ०८.०० वाजेच्या सुमारास गंगुबाईचा ओरडण्याचा आवाज आल्यामुळे फिर्यादी बिराजी याने जावुन पाहिले असता चिंचमाळ येथे राहणारे आरोपी क्र.१ ते ३ हे तिघे गंगुबाई व यशवंतला शिवीगाळ करत होते. फिर्यादी बिराजी तेथे जात असताना आरोपी क्र.१ ते ३ हे गंगुबाई व यशवंतला मारु लागले. त्यामुळे फिर्यादी बिराजी तेथे गेला असता आरोपी क्र.१ हा त्याला "तुमची गुरे इथे चारायला आणायची नाही" असे बोलला. फिर्यादी बिराजी आरोपीस 'वर्षाचे १२ महिने आमची गुरे येथुनच जातात' असे म्हणाला असता आरोपी क्र.१ ते ३ यांना राग आला व आरोपी क्र.२ याने फिर्यादी बिराजी यास पाण्यात ढकलुन दिले व हाताबुक्क्याने मारहाण केली. आरोपी क्र.१ व ३ यांनी गंगुबाईला काठीने हातावर व छातीवर फटके मारले. तसेच आरोपी क्र.१ ते ३ यांनी यशवंतला देखील काठीने मारहाण करुन दमदाटी केली. सदर प्रकार घडत असताना धावु बाबु केंडे, भगवान बाबु केंडे व लक्ष्मण केंडे हे भांडण सोडवायला आले व त्यांनी फिर्यादी बिराजी, त्याची पत्नी व मुलाला आरोपींपासुन सोडविले. सदरवेळी झटापटीत गंगुबाईच्या गळयातील दोन डाव मणी कोठेतरी गहाळ झाले. फिर्यादी बिराजी याने दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी क्र.१ ते ३ यांच्याविरुद्ध रोहा

पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१४९/२०२४ वर भा.न्या.सं.कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२) सह कलम ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल झाला.

०३. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने तपासी अधिकारी पो. हवा. ए. जी. पाटील यांनी तपास केला. त्यांच्या तपासात आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे आरोपींविरुद्ध या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाले.

०४. नि.क्र.१० वर आरोपींविरुद्ध भा.न्या.सं.कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२) सह कलम ३(५) या अपराधाकरीता दोषारोप ठेवला. आरोपींनी गुन्हा कबुल केला नसल्यामुळे त्यांच्या विरुद्ध खटला चालविण्यात आला.

०५. आरोपींविरुध्द आलेल्या पुराव्याच्या अनुषंगाने त्यांना स्पष्टीकरण देण्याची संधी मिळावी म्हणुन त्यांचे अनुक्रमे नि.क्र.३४ ते ३६ वर भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ कलम ३५१(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविले. आरोपींनी त्यांच्याविरुध्द खोटी केस केल्याचा बचाव घेतला आहे.

०६. अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ श्री. ए. एल. पवार व आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. एम. डी. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाची हकीगत, त्यांनी अभिलेखावर आणलेला पुरावा विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित होत आहेत. त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत पुढील प्रमाणे नोंदवीत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. दि.२४.०७.२०२४ रोजी सकाळी ०८.०० वाजणेच्या सुमारास मौजे माळसई, ता. रोहा, जि. रायगड येथे फिर्यादी बिराजी याची पत्नी | |

गंगुबाई व मुलगा यशवंत गुरे चरवित असताना आरोपी क्र.१ ते ३ यांनी आपसात संगनमत करुन लाकडी काठी, की ज्या शस्त्राने मारहाण केल्यास मृत्यू होण्याचा संभव आहे हे माहित असुनही अशा शस्त्राने फिर्यादी बिराजी याची पत्नी गंगुबाई व मुलगा यशवंत यांना इच्छापूर्वक दुखापत पोहोचवुन भा.न्या.सं. कलम ११८ (१) सह कलम ३(५) प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? .. नाही

२. वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ ते ३ यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादी बिराजी याची पत्नी गंगुबाई व मुलगा यशवंत यांना इच्छापूर्वक दुखापत पोहोचवुन भा.न्या.सं. कलम ११५ (२) सह कलम ३(५) प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? .. नाही

३. वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ ते ३ यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादी बिराजी, त्याची पत्नी गंगुबाई व मुलगा यशवंत यांना शिवीगाळ करुन अपमानित करुन त्यांना सार्वजनिक शांतता भंग करण्यास प्रक्षोभित करुन भा.न्या.सं. कलम ३५२ सह कलम ३(५) प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? .. नाही

४. वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ ते ३ यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादी बिराजी, त्याची पत्नी गंगुबाई व मुलगा यशवंत यांना फौजदारीपात्र धाकदपटशा करुन भा.न्या.सं. कलम ३५१(२) सह कलम ३(५) प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? .. नाही

५. काय आदेश ? आरोपी क्र.१ ते ३ यांना निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ करीता –

०७. मुद्दा क्र.०१ ते ०४ एकमेकांशी संबंधित असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांची कारणमीमांसा एकत्रितपणे नोंदवित आहे.

०८. फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) याने त्याच्या सरतपासात घटनेच्या दिवशी सकाळी ०८.०० वाजेच्या सुमारास त्याला त्याच्या बायको व मुलाचा जोरात आवाज आल्यामुळे तो आवाजाच्या दिशेने वाडा सोडुन थोडया अंतरावर गेला असता आरोपी क्र.१ ते ३ त्याच्या बायको आणि मुलाला मारहाण करत असल्याचे त्याने सांगितले आहे. त्याने आरोपी क्र.१ ते ३ यांनी त्याला पाण्यात नेवुन बुडवल्याचे तसेच तिघांनी मिळून त्याला तसेच त्याच्या पत्नीला काठीने मारल्याचे कथन केले आहे. त्याने पुढे सदर मारहाण चालु असताना धावु केंडे, भगवान केंडे, व लक्ष्मण (सा.क्र.०४) भांडणे सोडवण्यासाठी आले, तसेच सदर भांडणात दोन डाव आणि मणी असे एकुण दिड तोळे दागिने गहाळ झाल्याचे सांगितले आहे. त्याने वस्तु अ व ब वरील दोन काठयांनी आरोपींनी त्याला, त्याच्या पत्नीला व मुलाला मारहाण केल्याचे सांगितले आहे. त्याने त्याच्या उलटतपासात आरोपींनी घटनास्थळाच्या पुर्व बाजुला असलेल्या पाण्यामध्ये त्याला बुडवल्याचे सांगितले आहे. त्याने रस्त्याच्या पश्चिमेस नदी असल्याचे देखील सांगितले आहे. त्याने त्याला लक्ष्मण (सा.क्र.०४) याने पाण्यातुन बाहेर काढल्याचे सांगितले आहे. त्याने त्याची झोपडी व घटनास्थळ यामधील अंतर अर्धा कि.मी. एवढे असेल असे सांगितले आहे. त्याने पुढे वस्तु अ व ब वरील काठया त्याने पोलीसांना दिल्या होत्या असे मान्य केले आहे. त्याने आरोपी त्यांच्या आधीच पोलीस ठाण्यात गेल्याचे समजल्यानंतर ते पोलीस ठाण्यात गेले असे देखील मान्य केले आहे.

०९. गंगुबाई (सा.क्र.०२) हिने तिच्या सरतपासात घटने दिवशी सकाळी ०८.०० वाजता

तिचा मुलगा यशवंत याने गुरे चरायला सोडली होती, आरोपी क्र.१ ते ३ तेथे आले व तिला शिवीगाळ केली, तसेच तिने समजावण्याचा प्रयत्न केला असता त्याने तिच्या खांदयावर व छातीवर काठीने उपटी मारल्या व त्यामुळे तिने आरडाओरडा केला असता तिचा पती व मुलगा तेथे आले असे सांगितले आहे. तिने आरोपी क्र.१ याने यशवंतला काठीने व आरोपी क्र.२ व ३ यांनी तिच्या पतीला हाताबुक्क्याने मारहाण करुन पाण्यात बुडवल्याचे कथन केले आहे. सदर झटापटीत आरोपी क्र.१ याने तिच्या गळयातील दोन डाव व मणी काढुन घेतल्याचे देखील सांगितले आहे. तिने तिच्या उलटतपासात आरोपी व त्यांच्यामध्ये गुरे चरण्यावरुन वाद आहे असे मान्य केले आहे.

१०. लक्ष्मण (सा.क्र.०४) याने दि.२४.०७.२०२४ रोजी तो त्याच्या गोठयात असताना त्याला आवाज ऐकु आल्यामुळे तो आवाज येत होता त्या ठिकाणी गेला व तेथे फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१), गंगुबाई (सा.क्र.०२) व यशवंत तसेच आरोपी क्र.१ ते ३ एकमेकांना शिवीगाळ करत होते व त्याने त्यांची भांडणे सोडविली असे सांगितले आहे. त्याने गुरे चरण्यावरुन त्यांची भांडणे चालु होती असे देखील सांगितले आहे. त्याने त्याच्या उलटतपासात घटना प्रत्यक्ष पाहिली नसल्याचे व माळसई येथे जाताना डाव्या हाताला नदी असल्याचे मान्य केले आहे.

११. विलास (सा.क्र.०३) हा घटनास्थळाचा पंचनामा करताना हजर असणारा साक्षीदार असुन त्याने दि.२४.०७.२०२४ रोजी पोलीसांनी घटनास्थळाचा नि.क्र.२० वरील पंचनामा केला तसेच फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) याने वस्तु अ व ब वरील दोन काठया दाखवल्या व पोलीसांनी त्या जप्त केल्या तसेच घटनास्थळाचे फोटो काढले असे सांगितले आहे. त्याने त्याच्या उलटतपासात या प्रकरणाव्यतिरिक्त दुस–या गुन्हयातील साक्षीदार घटनास्थळी हजर नव्हते तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजुला पाणी होते असे सांगितले आहे.

१२. डॉ. पी. बी. नाखवा (सा.क्र.०५) याने त्याच्या सरतपासात दि.२६.०७.२०२४ रोजी

तो सिव्हील हॉस्पीटल, अलिबाग येथे वैद्यकीय अधिकारी म्हणुन कार्यरत असताना त्याने फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१), गंगुबाई (सा.क्र.०२) व यशवंत यांना तपासल्याचे सांगितले आहे. त्याने त्या तिघांना त्यांचे नातेवाईक प्रकाश कोपरे यांनी आणल्याचे व त्या तिघांनी दि.२४.०७.२०२४ रोजी सकाळी ०८.०० वाजेच्या सुमारास मारहाण झाल्यामुळे दुखापत झाल्याचे सांगितल्याचे कथन केले आहे. त्याने फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) यास जोराच्या आघातामुळे पाठीवर व अन्य ठिकाणी दुखापत झाल्याचे सांगितले आहे. त्याने पाठीवरील दुखापत हाताबुक्क्यामुळे झाल्याचे सांगितले आहे. त्याने गंगुबाई (सा.क्र.०२) हिच्या उजव्या खांदयावर काठी व हाताच्या बुक्क्यांमुळे दुखापत झाल्याचे सांगितले आहे. त्याने तिच्या डाव्या कोपरावर काठी व हाताच्या बुक्क्यांमुळे व छातीवर कडक व टणक वस्तु तसेच बुक्क्यांमुळे दुखापत झाल्याचे सांगितले आहे. त्याने यशवंतच्या मानेच्या काटयावर व ओठावर काठी व हाताच्या बुक्क्यांमुळे दुखापत झाल्याचे सांगितले आहे. त्याने तिघांच्याही सर्व दुखापती किरकोळ स्वरुपाच्या व २४ तासापेक्षा जास्त अवधीच्या कालावधीतील असल्याचे सांगितले आहे. त्याने त्याप्रमाणे त्या तिघांचे अनुक्रमे नि.क्र.२५ ते २७ वरील वैद्यकीय प्रमाणपत्र जारी केल्याचे सांगितले आहे. त्याने त्याच्या उलटतपासात २४ तासांपेक्षा जास्त अवधीच्या कालावधीतील दुखापत म्हणजे २४ तासांपेक्षा जास्त व ४८ तासांपेक्षा कमी अवधीतील दुखापत असते असे मान्य केले आहे. त्याने नि.क्र.२५ ते २७ वरील वैद्यकीय प्रमाणपत्रातील दुखापती हया ४८ तासांपेक्षा जास्त अवधीच्या कालावधीतील असल्याचे मान्य केले आहे. त्याने काठीने मारल्यास व्यक्तीच्या अंगावर वळ उठतात, परंतु सदर व्यक्तींच्या अंगावर कोणतेही वळ नसल्याचे मान्य केले आहे. त्याने फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) याच्या अंगावरील दुखापत व्यक्ती पाठीवर पडल्यास तसेच गंगुबाई (सा.क्र.०२) व यशवंत यांच्या अंगावरील दुखापती व्यक्ती खाली जमीनीवर पडल्यास होवु शकतात असे मान्य केले आहे.

१३. तपासी अधिकारी पो. हवा. ए. जी. पाटील (सा.क्र.०६) याने त्याच्या तपासात आरोपी क्र.१ ते ३ यांनी फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) व साक्षीदारांना दोन काठयांनी मारहाण करुन शिवीगाळ व दमदाटी केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्याने त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केल्याचे कथन केले आहे. त्याने प्रस्तुत प्रकरणातील तसेच आरोपींनी फिर्यादीविरुध्द दाखल केलेल्या प्रकरणातील घटनास्थळाचा एकच पंचनामा फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) याच्या सांगण्यावरुन केल्याचे व त्यावेळी तेथे आरोपी हजर नसल्याचे मान्य केले आहे. त्याने दोन्ही वेगवेगळया गुन्हयात वेगवेगळया प्रत्येकी दोन काठया गुन्हयात वापरल्याचे पंचनाम्यात नमुद असल्याचे मान्य केले आहे. त्याने आरोपींकडुन कोणत्याही काठया जप्त केल्या नसल्याचे देखील मान्य केले आहे. त्याने घटनास्थळाच्या जवळ नदी नसल्याचे सांगितले आहे. त्याने शेजारच्या शेतात जमा झालेल्या पाण्यात फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) यास ढकलले होते असे सांगितले आहे. त्याने उभयपक्षात जमीनीवरुन वाद असल्याचे मान्य केले आहे.

१४. प्रस्तुत प्रकरणात दोन्ही पक्षात घटना घडण्याच्या पुर्वीपासुन जमीनीवरुन वाद असल्यामुळे त्यांचे संबंध चांगले नसल्याचे दिसत आहे. आरोपींनी देखील फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) व त्याच्या कुटुंबियांविरुध्द फिर्याद दाखल केल्याचे दिसत आहे. अशा परिस्थितीत आरोपींना दोषी ठरविण्यासाठी अभियोगपक्षाचा पुरावा अत्यंत विश्वासार्ह व संशयविरहीत असणे आवश्यक आहे. उपरोक्त साक्षीदारांची साक्ष एकमेकांशी सुसंगत असणे देखील आवश्यक आहे. फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) याने त्याच्या सरतपासात घटनेवेळी त्याची बायको व मुलाचा जोरजोरात आवाज आल्यामुळे तो घटनास्थळी गेला असे सांगितले आहे. त्यावेळी तो माळसई रोडच्या कचराकुंडीजवळ रहात असलेल्या ठिकाणी झाडु मारत होता असे सांगितले आहे. त्याने त्याच्या उलटतपासात त्याची झोपडी व घटनास्थळ यामध्ये साधारण अर्धा कि.मी. अंतर असल्याचे

सांगितले आहे. अशा परिस्थितीत अर्धा कि.मी. अंतरावरुन त्याने त्याच्या बायको व मुलाचा जोरजोरात आवाज ऐकला हे त्याचे कथन विश्वासार्ह वाटत नाही. त्याने तिन्ही आरोपींनी त्याला मारहाण करुन पाण्यात नेवुन बुडवल्याचे सांगितले आहे. परंतु गंगुबाई (सा.क्र.०२) हिने आरोपी क्र.२ व ३ यांनी तिच्या पतीला मारहाण करुन पाण्यात नेवुन बुडवल्याचे सांगितले आहे. फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) याने त्याला घटनास्थळाच्या पुर्व बाजुला पाण्यामध्ये नेवुन बुडवल्याचे सांगितले आहे. परंतु नि.क्र.२० वरील घटनास्थळाच्या पंचनाम्यात कोठेही एखादयाला बुडवण्याइतपत पाणी असल्याचा उल्लेख नाही. त्याला लक्ष्मण (सा.क्र.०४) याने पाण्यातुन बाहेर काढल्याबाबत त्याने सांगितले आहे, परंतु लक्ष्मण (सा.क्र.०४) याने त्याच्या पुराव्यात आरोपींनी फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) यास पाण्यात बुडवले होते किंवा त्याने त्याला पाण्यातुन बाहेर काढले असे कोठेही सांगितले नाही. फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) याने बायको व मुलगा म्हशीसोबत गेले असताना सदर प्रकार घडल्याचे सांगितले आहे. त्याच्या कथनावरुन त्याची बायको व मुलगा एकत्र असताना सदर घटना घडल्याचे दिसत आहे, परंतु गंगुबाई (सा.क्र.०२) हिने तिच्या सरतपासात आरोपींनी सुरुवातीला तिला शिवीगाळ व मारहाण केली आणि तिचा आवाज ऐकुन फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) धावत आला तसेच तिचा मुलगा यशवंत देखील आला असे सांगितले आहे. फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) याने आरोपी क्र.१ ते ३ यांनी गंगुबाई (सा.क्र.०२) हिस काठीने मारल्याचे सांगितले आहे, परंतु गंगुबाई (सा.क्र.०२) हिने तिच्या सरतपासात तिला काठीने कोणी मारले याबाबत निश्चितपणे कोणाचेही नाव घेतले नाही. फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) याने सदर भांडणात दोन डाव आणि मणी असे दिड तोळे दागिने गहाळ झाल्याचे सांगितले आहे, याउलट गंगुबाई (सा.क्र.०२) हिने आरोपी क्र.१ याने तिच्या गळयातुन दोन डाव व मणी काढुन घेतल्याचे सांगितले आहे. दोघांचेही शपथेवरील कथन सुसंगत नाही. घटनेवेळी हजर असणारा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तसेच

जखमी यशवंत यास अभियोगपक्षाने तपासले नाही. लक्ष्मण (सा.क्र.०४) यास जरी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणुन तपासण्यात आले असले तरी उभयपक्ष एकमेकांना शिवीगाळ करत होते या व्यतिरिक्त त्याने त्याच्या पुराव्यात काहीच सांगितले नाही.

१५. नि.क्र.२० वरील घटनास्थळाच्या पंचनाम्यावरुन वस्तु अ व ब वरील दोन काठयांनी आरोपींनी मारहाण केल्याचे अभियोगपक्षाचे कथन असले तरी नेमक्या कोणत्या आरोपीने कोणाला मारहाण केली याबाबत उपरोक्त दोन्ही साक्षीदारांच्या पुराव्यातुन कोणतीही स्पष्टता येत नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे आरोपींनी व फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) याने दाखल केलेल्या फिर्यादीच्या अनुषंगाने दाखल झालेल्या दोन्ही गुन्हयातील घटनास्थळाचा पंचनामा हा प्रस्तुत प्रकरणात एकत्रित केला असुन तपासी अधिकारी पो. हवा. पाटील (सा.क्र.०६) याने दोन्ही प्रकरणात प्रत्येकी दोन वेगवेगळया काठया वापरण्यात आल्याचे सांगितले आहे. असे असतानाही सदर पंचनाम्यावेळी दोन्ही घटनेचे ठिकाण एकच असताना सदर घटनास्थळाचा व काठया जप्तीचा पंचनामा केवळ फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१) याच्याच सांगण्याप्रमाणे का करण्यात आला याबाबत अभियोगपक्षाने कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही. अशा परिस्थितीत वस्तु अ व ब वरील काठया जप्तीच्या पंचनाम्याआधारे आरोपींविरुध्द कोणतेही अनुमान काढता येणार नाही.

१६. उपरोक्त पुराव्याआधारे उभयपक्षात भांडणे झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही, परंतु सबळ व ठोस पुराव्याअभावी फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१), गंगुबाई (सा.क्र.०२) व यशवंत यांना आरोपींनी मारहाण केल्यामुळे दुखापती झाल्याचे अनुमान काढता येत नाही. सदर दुखापती आरोपींना मारहाण करत असताना किंवा त्यावेळी खाली पडल्यामुळे झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. डॉ. नाखवा (सा.क्र.०५) याने देखील सदर जखमा खाली पडल्यामुळे होवु शकतात असे मान्य केले आहे. आणखी महत्वाची बाब म्हणजे फिर्यादी बिराजी (सा.क्र.०१),

गंगुबाई (सा.क्र.०२) व यशवंत यांच्या नि.क्र.२५ ते २७ वरील वैद्यकीय प्रमाणपत्रांचे अवलोकन केले असता त्यामध्ये त्यांना दि.२४.०७.२०२४ रोजी सकाळी ०८.०० वाजता मारहाण केल्याची व दि.२६.०७.२०२४ रोजी संध्याकाळी ०५.३० वाजता तपासण्यात आल्याची वेळ नमुद आहे. त्यांच्या वैद्यकीय प्रमाणपत्रात सदर दुखापती २४ तासापेक्षा जास्त कालावधीच्या असल्याचे देखील नमुद आहे. डॉ. नाखवा (सा.क्र.०५) याने त्याच्या उलटतपासात २४ तासापेक्षा जास्त कालावधीची दुखापत म्हणजे २४ तासापेक्षा जास्त व ४८ तासापेक्षा कमी कालावधीतील दुखापत असल्याचे सांगितले आहे, परंतु त्याने स्वतः सदर वैद्यकीय प्रमाणत्राचे अवलोकन केले असता सदर दुखापती ४८ तासांपेक्षा जास्त कालावधीच्या असल्याचे मान्य केले आहे. सदर वेळेतील विसंगती देखील अभियोगपक्षाच्या खटल्याविषयी शंका उपस्थित करत आहे. अशा प्रकारे अभियोग पक्षाचा पुरावा आरोपींना दोषी ठरविण्याइतपत पर्याप्त नाही. सबब, अभियोग पक्ष आरोपींविरुद्ध गुन्हा शाबीत करण्यास अपयशी ठरला असल्याने मी मुद्दा क्र.०१ ते ०४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवीत आहे.

## <u>मुद्दा क्रमांक ०५ करीता –</u>

१७. वरील चर्चेवरुन स्पष्ट होते की, भा.न्या.सं. कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२) सह कलम ३(५) या अपराधांच्या सिद्धतेकरीता आवश्यक असणा–या घटकांची परिपुर्ती अभियोग पक्षास करता आली नाही. त्यामुळे आरोपी क्र.१ ते ३ निर्दोष मुक्ततेस पात्र आहेत. वस्तु अ व ब वरील जप्त दोन्ही काठया मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नष्ट करणे न्यायोचित ठरेल. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.०५ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

०१. आरोपी क्र. १ **लिंबाजी रामचंद्र केंडे**, आरोपी क्र.२ **राजु लिंबाजी केंडे** आणि आरोपी क्र.३ **जनाबाई लिंबाजी केंडे** यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता,

२०२३ कलम २७१(२) अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२) सह कलम ३(५) या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

०२. आरोपी क्र.१ ते ३ यांनी पुर्वी सादर केलेले वैयक्तीक व जामीनदाराचे बंधपत्र रद्द करुन जामीनदारांना बंधपत्रातून मुक्त करण्यात येत आहे.

०३. आरोपी क्र.१ ते ३ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७अ चे पुर्ततेकरीता प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र ठेवढ्याच रक्कमेच्या लायक जामीनासहीत आजपासुन ०७ दिवसांच्या आत सादर करावे.

०४. जप्त मुद्देमाल दोन काठया मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात याव्या.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत..

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2026.07.10 18:09:28 +0530

स्थळ : रोहा. (सं. वि. खैरे)

दिनांकः १०.०७.२०२६. न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.

## भाग क

## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४(iii) अन्वये]

## अभियोग पक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ.अभियोग पक्ष :-**

| अ.क्र | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ०१. | बिराजी भाग्या केंडे | फिर्यादी व जखमी | १५ |
| ०२. | गंगुबाई बिराजी केंडे | जखमी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | १८ |
| ०३. | विलास गणपत शिर्के | घटनास्थळ पंच | १९ |
| ०४. | लक्ष्मण भगवान केंडे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | २१ |
| ०५. | डॉ. पी. बी. नाखवा | वैद्यकीय अधिकारी | २४ |
| ०६. | पो. हवा. ए. जी. पाटील | तपासी अधिकारी | २९ |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास :-**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक. | निरंक. |

**क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास :-**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक. | निरंक. |

## अभियोग पक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाण्यांची यादी

**अ.अभियोग पक्ष :-**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | सा.क्र.०१/१६ | फिर्याद |
| ०२. | सा.क्र.०३/२० | घटनास्थळ पंचनामा |

| | | |
|---|---|---|
| ०३. | सा.क्र.०५/२५ | फिर्यादी बिराजी केंडे याचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ०४. | सा.क्र.०५/२६ | गंगुबाई केंडे याचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ०५. | सा.क्र.०५/२७ | यशवंत केंडे याचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ०६. | सा.क्र.०६/३० | मुद्देमाल पावती |
| ०७. | सा.क्र.०६/३१ | जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्यासाठी वैद्यकीय अधिकारी यांना पाठविलेले पत्र |
| ०८. | सा.क्र.०६/३२ | जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्यासाठी वैद्यकीय अधिकारी यांना पाठविलेले पत्र |

**ब. बचाव पक्ष :-**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | स्वरूप |
|---|---|---|
| ०१. | निरंक. | निरंक. |

**क. न्यायालयीन निशाणी :-**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | स्वरूप |
|---|---|---|
| ०१. | निरंक. | निरंक. |

**ड. भौतिक वस्तू :–**

| अ.क्र. | भौतिक वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | अ व ब. | दोन काठया. |

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2026.07.10 18:09:44 +0530

स्थळ : रोहा. (सं. वि. खैरे)

दिनांकः १०.०७.२०२६. न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same word to word as per the original Judgment or Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | :- | Shri. A. A. Nakhawa,<br>Grade -III. |
| Name of the Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C. Roha, |
| Judgment / Order dictated on | :- | 10/07/2026 |
| Judgment / Order delivered on | :- | 10/07/2026 |
| Judgment / Order signed on | :- | 10/07/2026 |
| Judgment / Order uploaded on | :- | 10/07/2026 |